जा.क्र.मंत्री को उद्या.रोज.,नावि./टिपणी/ /२० दि.
186/2026

मंत्री

पुण्यश्लोक 300

**मंत्री**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 10 APR 2026

**विषय : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन – संबंधित विभागामार्फत सक्रिय सहभाग व जनजागृती बाबत.**

मा. महोदय / महोदया,

दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक न्याय, समता व बंधुता यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून सामाजिक न्याय, समता व मानवाधिकारांचा दृढ पाया रचला. शिक्षण, संघटन आणि समाजसेवा या त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपण ही स्पर्धा आयोजित केली आहे.

आपल्या विभागामार्फत चालवण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सर्व वसतिगृहांमध्ये स्पर्धेबाबत व्यापक जनजागृती करून सहभागासाठी प्रोत्साहित करणे, प्रशासन यांच्याशी समन्वय साधणे, तसेच स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक सहकार्य करणे ही विनंती आहे. या उपक्रमामुळे युवक व युवतीमध्ये विचारप्रवर्तक लेखनाची सवय, सामाजिक भान व नेतृत्वगुण विकसित होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास आहे.

आपल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

संबंधित स्पर्धेच्या नियम व अटींची माहिती या पत्रासोबत जोडली आहे.

**आपला विश्वासू,**

मंगल प्रभात लोढा

**(मंगल प्रभात लोढा)**

**प्रति,**

**मा. आयुक्त,**

**समाजकल्याण आयुक्तालय,**

**महाराष्ट्र राज्य.**

**कार्यालय पत्ता :** दालन क्र. २०२, २रा मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
**दूरध्वनी क्र. :** ०२२-२२०२ ५३०८/२२०२ ४५९२, **ई-मेल :** *min.skills@maharashtra.gov.in*



# भारतरत्न
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## यांच्या जयंती निमित्त






# राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

विषय

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य

उदाहरणार्थ – मतदानाचा हक्क, वारसा हक्क, प्रसूती रजेचा हक्क.

**स्पर्धेचा कालावधी 14 ते 20 एप्रिल 2026**

**गट - 1**
आयटीआय / डिप्लोमा
प्रशिक्षणार्थी व उत्तीर्ण विद्यार्थी
बायफोकल व MCVC विद्यार्थी
शब्दमर्यादा - 500 ते 800 शब्द

**गट - 2**
पुरुष / महिला
खुला वर्ग
शब्दमर्यादा - 800 ते 1200 शब्द

मार्गदर्शक

## श्री देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री

संकल्पना

## श्री मंगल प्रभात लोढा
मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

निबंध PDF स्वरुपात पाठवावा.
तसेच नियम व अटी आणि
अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करा.

https://forms.gle/RcFPhcUgY8X4P2NT8

संपर्क : 915 2230 193

**आकर्षक पारितोषिके प्रत्येक गटासाठी**

| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
| --- | --- | --- |
| ₹ 31,000/- स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र | ₹ 21,000/- स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र | ₹ 11,000/- स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र |

**तुमचे विचार आम्हाला लिहून पाठवा... आणि परिवर्तनाच्या प्रवासात सहभागी व्हा!**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६ नियमावली**

**विषय: भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेले कार्य**

**स्पर्धेचे गट:**

- गट १ – ITI / डिप्लोमा / बायफोकल / MCVC विद्यार्थी (शब्दमर्यादा: ५०० ते ८०० शब्द)
- गट २ – पुरुष / महिला खुला गट (शब्दमर्यादा: ८०० ते १२०० शब्द)

**कालावधी: दिनांक १४ ते २० एप्रिल २०२६**

निबंध सादरीकरण: निबंध PDF (हस्तलिखित किंवा टंकलिखित) स्वरूपात सोबत दिलेल्या लिंक वर अपलोड करणे आवश्यक आहे.

https://forms.gle/RcFPhcUgY८X४P२NT८

**पारितोषिके: दोन्ही गटातून**

प्रथम – ₹३१,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

द्वितीय – ₹२१,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

तृतीय – ₹११,००० + स्मृतिचिन्ह + सन्मानपत्र

निबंध मराठी भाषेत लिहिणे अनिवार्य असावा आहे.निबंध मूळ (Original) असावा, कॉपी आढळल्यास स्पर्धक अपात्र ठरेल. प्रत्येक स्पर्धकाने एकच निबंध सादर करावा व मजकूर शिष्ट आणि सुसंस्कृत असावा.

निबंध हस्तलिखित किंवा टंकलिखित स्वरूपात स्वीकारला जाईल; मात्र अंतिम सादरीकरण PDF स्वरूपातच करणे आवश्यक आहे. निबंध टाईप करून किंवा हस्तलिखित निबंध स्कॅन करून दिलेल्या लिंकवर अपलोड करावा.

स्पर्धकांनी खालील माहिती आवश्य भरावी: पूर्ण नाव, गट क्रमांक, संपर्क क्रमांक, ITI/शाळा/महाविद्यालयाचे नाव व पूर्ण पत्ता.

**सर्व सहभागी स्पर्धकांना डिजिटल प्रमाणपत्र दिले जाईल.**

**स्पर्धेबद्दल अधिक महितीसाठी 9152230193 या व्हाट्सपअप नंबर वरती संपर्क करावा.**